Open Access

# उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 850 – 854
DOI: 10.5281/zenodo.10281411

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना

प्रा. डॉ. चंदन एम. बावलगावे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर जि. लातूर ४१३५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: bawalgavecm@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात जेवढे गांधीजींचे स्थान महत्त्वाचे आहे तेवढेच भारतातील ग्रामविकासा मध्ये असलेले दिसून येते. महात्मा गांधींनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेचा दौरा केला व दक्षिण आफ्रिकेतील काळया व गोऱ्या वर्णभेदा विरुद्ध आंदोलन करून काळया लोकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. इसवी सन 1920 ला लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला आणि गांधीजींचा सक्रिय राजकारणात प्रवेश झाला. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ आणि चलेजाव चळवळीच्या माध्यमातून गांधींनी जगासमोर आंदोलनाचा एक नवीन मार्ग ठेवला. महात्मा गांधींचे नेतृत्वाखाली ही तीन मोठे देशव्यापी आंदोलने झाली त्यामुळे या कालखंडाला गांधीयुग म्हणून ओळखले जाते. सत्य, अहिंसा, उपोषण, सत्याग्रह, ब्रह्मचर्य, याबरोबरच महात्मा गांधींनी ग्रामविकास व खादीच्या माध्यमातून देशप्रेमाचा एक नवीन संदेश भारतीयांना दिला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये स्वदेशी, चरखा, कुटीर उद्योग व खादी अशा सामान्य वाटणाऱ्या गोष्टींना महात्मा गांधींनी एक मोठे शस्त्र बनवले. असहकार चळवळीमध्ये परदेशी कापडावर बहिष्कार टाकून स्वदेशी चरखा व हातमागावर तयार झालेल्या खादीचा वापर या सामान्य गोष्टीला मोठ्या आंदोलनाचे स्वरूप दिले.

खेड्याकडे चला या महात्मा गांधीजींच्या वाक्यावरूनच आपल्याला त्यांच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेची कल्पना येते. भारत हा कृषी प्रधान देश आहे. महात्मा गांधींना खरा भारत हा ग्रामीण भागात आहे म्हणजेच खेड्यामध्ये आहे याची चांगली जाणीव होती. गांधीजींचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट होता की ज्या देशाची जनता मोठ्या प्रमाणात खेड्यात राहते ती खेडी अगोदर सुधारले पाहिजे. खेडी आणि खेड्यातील समाज हा खऱ्या अर्थाने या देशाचा कणा आहे ही संकल्पना आजही

तेवढेच विचाराने आपल्याला खरे वाटते कारण शहरांना होणारा अन्नधान्याचा पुरवठा हा ग्रामीण भागातूनच होतो. भारतासारख्या विशाल विविधतेने नटलेल्या देशातील ग्रामीण खेडी ही स्वयंपूर्ण झाली पाहिजेत तेव्हाच या देशाचा विकास साधला जाईल अशी विचारधारा महात्मा गांधी यांनी ग्रामस्वराज्य संकल्पनेतून मांडली. भारतातील ग्रामीण भागाचा विकास केल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही. त्याकरिता खेड्यात राहणाऱ्या लोकांचा विकास पहिल्यांदा झाला पाहिजे यासाठी महात्मा गांधींनी ग्रामीण भागातील लोकांची बेकारी कमी करण्यासाठी अखिल भारतीय विनकर संघटना, अखिल भारतीय ग्रामीण उद्योग संघटना स्थापन केली. गोसेवा संघ, आदिम जाती सेवा संघ, हरिजन सेवक संघ, गांधी सेवा सदन, खादी विद्यालय अशा प्रकारच्या संघटनांची स्थापना केली आणि या संघटनेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करणे हेच त्यांचे ध्येय असल्याचे दिसून येते. कृषी विकास, कुटीर उद्योग, खादी, हातमाग यांच्या आधारावरच महात्मा गांधीजींचा समाजाचा विकास करण्यावर भर होता. महात्मा गांधींनी भारतीयांना एक नवीन विचार दिला तो म्हणजे ग्रामीणवाद. गांधीजींच्या लेखनातून व मांडलेल्या विचारातून खेड्यातील लोकांचा रचनात्मक व निर्मितीक्षम बदल तसेच आत्मनिर्भर खेड्यांची पुनर्बांधणी हा महत्त्वपूर्ण विचार पुढे आलेला दिसून येतो.

**ग्रामस्वराज्य**

महात्मा गांधीची ग्रामस्वराज्य ही संकल्पना त्यांच्या हिंदू स्वराज्य या पुस्तकातून पुढे आलेली दिसते. त्यात त्यांनी महान भारताची कल्पना केली. या पुस्तकामध्ये महात्मा गांधींनी आत्मनिर्भर खेड्यालाच राष्ट्रीय आराखड्याचे एकक मानले. ते म्हणतात, खेड्यांच्या स्थितीवर राष्ट्राच्या स्थितीचे प्रतिबिंब दिसेल. ग्राम स्वराज्य हे सर्वांसाठी सर्वांच्या कल्याणासाठी असेल. यात शेतकरी, अपंग व मजूर यांचाही समावेश असेल. गांधीजींच्या या ग्रामस्वराज्य संकल्पनेमध्ये राजा, जमीनदार, शेतकरी, भूमिहीन, हिंदू, मुस्लिम, ईसाई यहूदी, पारशी हे सर्व समान असतील. त्यामध्ये जातिभेद, धर्मभेद, वंशवेद यांना कोणत्याही प्रकारचे स्थान असणार नाही. कारण हे ग्राम स्वराज्य सर्व लोकांचे राज्य, न्यायाचे राज्य असेल.

**ग्रामीण विकास**

महात्मा गांधींनी ग्रामस्वराज्य संकल्पनेत श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. व्यक्ती हा श्रीमंत असो की गरीब त्याने श्रम केलेच पाहिजे. श्रम हे संपत्ती किंवा भांडवला पेक्षा कमी नाही. व्यक्तीने श्रमाची पूजा करावी सर्वांनी श्रम केल्यामुळेच समाजाचा व ग्रामाचा विकास होईल असे त्यांचे मत होते. ग्रामीण जनतेच्या समस्यांचे निराकरण ग्रामीण समाजाची प्रगती घडवून आणणे म्हणजे ग्रामविकास असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. महात्मा गांधींच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा महत्त्वाचा विचार म्हणजे सर्वोदय होय. समाजातील सर्वांचे कल्याण व्हावे समाजातील एक जरी व्यक्ती विकासापासून वंचित राहिला तरी सर्वोदय होणार नाही अशा प्रकारचा सर्व व्यापक विचार महात्मा गांधींनी मांडला. ते म्हणतात, हिंदुस्तान हा काही शहरात आढळणारा नाही तर तो सात लाख खेड्यात आढळेल ही गोष्ट मला पटलेली आहे आणि ती मी असंख्य वेळा बोलून दाखवलेली आहे. पण आपण शहरवासीयांची अशी समजूत आहे की हिंदुस्तान शहरात आढळतो.

खेड्यातल्या लोकांना पुरेसे अन्न कपडे निवारा मिळतो की नाही याची आपण चौकशी केली नाही. ग्रामविकास याचाच एक भाग म्हणून त्यांनी सेवाग्राम हा आश्रम वर्धा येथे स्थापन केला. या आश्रमात त्यांनी लोकांना स्वातंत्र्यलढ्याबाबत मार्गदर्शन केले. बहुसंख्या जनता ही खेड्यात राहते. त्यामुळे खेडी सुधारली तरच देश सुधारेल हे ब्रीदवाक्य त्यांनी सांगितले. म्हणून त्यांनी खेड्यात राहून ग्रामीण जनतेची सेवा केली. ग्रामविकास बाबत त्यांनी ग्रामीण दृष्टीचा विकास, ग्राम दर्शन, सहकार, शेती, पशुपालन, औषध व्यवस्था, अंधश्रद्धा, आर्थिक क्षमता व अस्पृश्यता, दारूबंदी व वाईट रूढी, परंपरा, प्रौढ शिक्षण व स्त्री सुधारणा, ग्रामोद्योग पुनर्जीवन, गावातील शांती दल, ग्रामपंचायतची निर्मिती अशा प्रकारचे विचार सांगून ग्रामीण विकासाचा मार्ग दाखवला.

**रामराज्य**

महात्मा गांधींनी रामराज्य हा हिंदू पारंपारिक शब्द वापरलेला दिसतो. या शब्दाचा आणि रामायणातील राम राज्याचा किंवा धर्माधिष्टित राज्याचा काही संबंध नाही. केवळ पारंपरिक शब्दांमध्ये आधुनिक विचारांची त्यांनी मांडणी केले आहे. या रामराज्या मध्ये उच्च नीच, श्रेष्ठ कनिष्ठ असा कोणताही भेदभाव नसेल. सर्व नागरिक समान असतील. स्त्री पुरुष, वंश पंथ, गरीब श्रीमंत असा भेदभाव रामराज्यामध्ये केला जाणार नाही. शासन व्यवस्थाही लोकांच्या हाती असेल. राम राज्यात प्रत्येक व्यक्तीला निर्भयतेने आणि स्वतंत्रतेने राहता येईल अशी कल्पना गांधीजींनी मांडली. याबरोबरच ही रामराज्याची संकल्पना सत्यावर आधारित व पारदर्शक असावी असा विचार महात्मा गांधींनी मांडला. ही राम राज्याची संकल्पना धार्मिक संप्रदायाला जोडणारी आहे. राम व रहीम हे वेगळे नाहीत ते एकच आहेत. राम राज्य सर्वच संप्रदायांना जोडणारे आहे. प्रत्येक संप्रदाय हा सत्यावर आधारित आहे. राज्य या संकल्पनेमध्ये सत्य व नैतिकतेला स्थान असायलाच पाहिजे असे महात्मा गांधींचे मत होते.

**खादीचा प्रसार**

स्वतंत्रता आंदोलनाच्या निमित्ताने महात्मा गांधींनी खादीला अचानकपणे अत्यंत महत्त्वाचे व मानाचे स्थान निर्माण करून दिले. परदेशी मालाची होळी व स्वदेशीचा स्वीकार असा नारा दिला गेला. त्या अंतर्गत खादीचा वापर व खादीचा प्रसार ही तत्व हाती घेतले गेले. म्हणूनच भारतातील अत्यंत सामान्य वर्गापासून ते गर्भ श्रीमंत किंवा प्रतिष्ठित लोकापर्यंत खादीचा प्रसार घडून आला. प्रसारच नव्हे तर खादीचे वस्त्र वापरणे म्हणजे देशभक्तीचे प्रतीक मानले जाऊ लागले. जसे की जाडी भरडी खादी वापरत असताना जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी कमला नेहरू यांना अशा जाड्या भरड्या कपड्यामुळे बराच त्रास सहन करावा लागत होता. तरीही देश प्रेमाने किंवा देशभक्तीचे प्रतीक बनलेल्या या खादीचा वापर त्यांनी सोडला नाही. साहजिकच या विचारामागे महात्मा गांधी विषयीची निष्ठा आणि त्यांनी सुरू केलेला खादीचा प्रसार हेच असे आपणास दिसून येते. वरील उदाहरणावरून आपणास असे निदर्शनाश येते की महात्मा गांधींनी खादी चे महत्व किती खोलवर रूजवलेले होते. परंतु या खादी विचाराच्या उत्पत्ती विषयी महात्मा गांधी म्हणतात, सन 1908 सालापर्यंत मी चरखा किंवा माग नजरेने पाहिला असल्याचे मला स्मरत नाही. तरी हिंद स्वराज्य मध्ये चरख्याने

हिंदुस्तानचे दारिद्र्य दूर होईल असे मी विधान केले. ज्या साधनांनी उपासमार टळेल त्याच मार्गाने स्वराज्य मिळेल ही कोणासही लक्षात येण्यासारखे गोष्ट आहे. सन 1915 साली दक्षिण आफ्रिकेहून स्वदेशी आलो तेव्हाही चरखा पाहायला मिळाला नव्हता. आश्रम स्थापला तेव्हा हातमाग सुरु केला. तो सुरू करताना मला खूप अडचणी आल्या. आम्ही सर्व अनभिज्ञ, त्यामुळे माग आनवला तरी तेवढ्यानेच तो चालेल असे नव्हते. आम्ही सर्व कलम बहाद्दर किंवा व्यापार जाणारे एकत्र जमलो होतो. आमच्यापैकी कारागीर असा कोणीच नव्हता त्यामुळे माग मिळविल्यानंतर ही विणकाम शिकण्याची आवश्यकता होती. अर्थात खादी हा विषय गांधी विचारातील फार पूर्वीचा किंवा उपजत होता असे नाही तर कालोघात ब्रिटिश लुटीची निती व भारतीय आर्थिक व व्यापार स्थिती किंवा कुटीर उद्योगाचा ऱ्हास यातून स्वदेशीचा विचार पुढे गेला व त्यापासूनच खादीच्या विचाराचा जन्म झाला.

चरख्यावर सूत कताई करणे व त्यापासून विणकाम करणे, खादीचे कापड बनविणे हे काही साधे काम नव्हते. ही एक प्रकारची कला आहे ती सहजगत्या अवगत होणारी नाही. महात्मा गांधी स्वतः आणि त्यांचे इतर सहकारी हे या कार्यापासून अन्नभेद अनभिज्ञ होते. त्यांना कोणाची तरी मदत घ्यावी लागणार होती. तेव्हा गुजरात मधील भडोच येथे गांधीजींची भेट गंगावबेन नावाच्या एका विधवा स्त्रीशी झाली. त्या महिलेने गांधीजींना चरखा व सुत कताई संबंधी सर्व मदत करण्याचे मान्य केले याविषयी महात्मा गांधी म्हणतात गुजरात मध्ये खूप भटकल्यानंतर बडोदा संस्थानातील विजापूर मध्ये गंगाभैरला चरखा सापडला. पुष्कळ कुटुंबा पाशी चरखे होते. पण ते त्यांनी माळयावर टाकलेले होते. कोणी त्यांचे सूत घ्यावयाला तयार असेल व त्यांना पेळू पुरविले जातील तर ते सूतकातण्यास तयार होते. गंगाबेने मला खबर दिली व माझ्या हर्षाला सीमा राहिली नाही. पेळू पुरविण्याचे काम कठीण वाटले. मरहूम भाई उमर सोबानी यांच्याशी गोष्ट काढता त्यांनी आपल्या गिरणीतून वेळू पुरविण्याचे शिरावर घेतले. मी ते पेळू गंगाबेन कडे पाठविले व सुत इतक्या झपाट्याने निघू लागले की मला हात टेकावे लागले. गांधीजीने गंगावेन व त्यांच्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने खऱ्या अर्थाने चरखा चालवण्यास गती दिली व सुत कताईच्या कामाला वेग आला. आश्रमातील लोकांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर चरके सुरू केले गेले आणि अशा प्रकारे खादी व स्वदेशीच्या आंदोलनाला वेग आला.

**सारांश**

महात्मा गांधी केवळ एक व्यक्ती नव्हे तर एक विचार किंवा तत्त्वज्ञान आहे. त्यांनी जे विचार मांडले त्या विचारांची आज जगाला नितांत आवश्यकता भासत असलेली आपणास दिसते.सत्य, अहिंसा, उपोषण, शांततेच्या मार्गाने सत्याग्रह, असहकार, ग्राम स्वराज्य, ग्राम विकास, खादी, रामराज्य या गोष्टीतून एक वेगळा दृष्टिकोन देण्याचे कार्य महात्मा गांधींनी केले. भारतासारख्या विशाल विविधतेने नटलेल्या देशातील ग्रामीण खेडी ही स्वयंपूर्ण झाली पाहिजेत तेव्हाच या देशाचा विकास साधला जाईल अशी विचारधारा महात्मा गांधी यांनी ग्रामस्वराज्य संकल्पनेतून मांडली. भारतातील ग्रामीण भागाचा विकास केल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही. त्याकरिता खेड्यात राहणाऱ्या लोकांचा विकास पहिल्यांदा झाला पाहिजे म्हणून सहकार, शेती, पशुपालन, औषध व्यवस्था तसेच अंधश्रद्धा, अस्पृश्यता,

दारूबंदी व वाईट रूढी, परंपरा निर्मूलन, प्रौढ शिक्षण व स्त्री सुधारणा, ग्रामोद्योग पुनर्जीवन, गावातील शांती दल, ग्रामपंचायतची निर्मिती अशा प्रकारचे विचार सांगून ग्रामीण विकासाचा मार्ग दाखवला.

**संदर्भ**


१. Virag S. Gawande, (Ed.), Ideology of Mahatma Gandhi, Adhar Publication, Amravati, p. 49.
२. डॉ. चौगुले सहदेव, पाथेर (भाग 2), रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती, मार्च 2012, पृष्ठ 28- 29.
३. डॉ. कठारे अनिल, आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, जून 2015, पृष्ठ 149.
४. डॉ. जोशी पी. जी., आधुनिक जग, विद्या प्रकाशन, नागपूर, सप्टेंबर 2000, पृष्ठ 454.
५. गांधी मो. क., अनू. पटवर्धन सिताराम पुरुषोत्तम, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथन, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, जानेवारी 2013, पृष्ठ 480.
६. गांधी मो. क., (संग्रहक) व्यास हरिप्रसाद, नवसंजीवनी प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, एप्रिल 1996, पृष्ठ 76.